# मराठवाड्यातील देवी-देवतांविषयक लोककथा

**प्रा.डॉ.पंडीत रानमाळ**
मराठी विभाग, मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे,
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

लोकवाड्:मयात लोककथाचे स्थान अनन्यसाधारण आहे. आजचे युग दुरदर्शन, इंटरनेटचे असले तरी लोककथेची गोडी कमी झालेली नाही. पूर्वी लोककथा लोकरंजनाचे प्रधानमाध्यम होते. अजूनही या माध्यमाची भुरळ प्रसारमाध्यमावर आहे. दुरदर्शन, इंटरनेटवरुन-'पंचतंत्र','विक्रमवेताळ' इ.लोककथा आजही मनोरंजनाचे कार्य करीत आहेत. आकाशवाणी,वृत्तपत्रे या माध्यमांमध्येही लोककथाच आपले स्थान टिकवून आहे.

भारत कथाप्रिय देश असून येथील लोककथांची परंपरा प्राचीन आहे. कथाप्रियतेमुळे लोककथा आजही लोकमानसावर अधिराज्य करित आहे. लोककथेकडे पाहण्याची दृष्टी श्रध्देची आणि भाविकतेची होती.लोककथेतून नातेमूल्याचे,जीवनमूल्यांचे शिक्षण तर मिळतेच पण रंजनाबरोबर बोधही होतो. पंचतंत्रातून विष्णूशर्मा याने राजकुमारांना नितिचे शिक्षण दिले. रामायण, महाभारत यातील नितीकथा प्राचीन असल्यातरी आजही समाजाला लोककथा संकलित करुन महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील अभ्यासक्रमांनी प्रदेशानुसार विविध प्रकारच्या लोककथा संकलित करुन त्यावर सामाजिक व वाड्:मयीन दृष्टया संशोधन केले व आजही चालू आहे.अनेक लोककथांच्या आशयात साम्य असले तरी प्रदेशानुसार लोककथेच्या स्वरुपात भिन्नता आढळुन येते. सामाजिक जीवनांशी लोककथा निगडीत असल्याने लोककथेमध्ये समाजजिवनाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. लोककथा दैनंदिन जिवनातून आविष्कृत झाल्यामुळे समाजातील परंपरा,देवदेवतांविषयीचा भक्तीभाव, लोकसमजुती, लोकजिवनातील आचार-विचार, सन-उत्सव, कुटुंबव्यवस्था, कुटुंबातील व्यक्तींचे परस्पर संबंध तसेच समाजातील विविध जाती-जमाती, त्यांचे परस्पर संबंध या सर्वांचे तपशील लोककथांमधुन येतात.समाजरचनेची ठळक वैशिष्ट्ये लोककथामधून स्पष्ट होतात.

मराठवाडा ही संत महंताची, कलावंताची, विचारवंताची तसेच ध्येयवेड्या पराक्रमी-माणसांची जन्मभुमी, कर्मभुमी आहे. तसेच सात जिल्हयाचा हा परिसर, गोदाकाठचा काही भाग समृध्द तर उरलेला भाग कोरडवाहु शेती असणारा आहे. त्यामुळे दुष्काळाच्या सावटाखाली आहे.माणसांची मने श्रद्धाशिल असलेली त्यामुळे इथला

माणुस देव- देवते,सन-उत्सवामध्ये आपले सुखपण शोधणारा आहे.त्यामुळेच की, काय या प्रदेशात विविध देवींचे शक्तीपीठे पाहावयास मिळतात. तुळजापूरची तुळजादेवी, अंबानगरीची योगेश्वरी, माहुरची देवी अशा शक्तीपीठाच्या तसेच मत्स्योदरी देवीसारख्या महात्मपर कथा मराठवाड्यातील लोकमानसात आजही दिसतात.

अंबड येथे मत्स्योदरीचा डोंगर आहे. या डोंगराचा आकार माशाप्रमाणे आहे. समोरुन तोंड उघडलेल्या माशाप्रमाणे हा डोंगर दिसतो. तर मागे निमुळता होत जाऊन शेवटी दोन पंखाच्या आकारांचे खडक त्याला जोडुन असलेले दिसतात. अंबरीष ऋषींचे इथे अत्यंत उग्र तपश्चर्या सतत पाच तपे म्हणजे आठ वर्षे केली. त्यांची ही तपश्चर्या केवळ दुध प्राशन करुन चालली होती. त्या त्याच्या तपश्चर्याने आदीमाया जगतजननी श्री जगदंबा प्रसन्न झाली. अंबरीश ऋषींनी महाकाली,महालक्ष्मी व महासरस्वती अशा तीन स्वरुपात तीची स्थापनप या डोंगरावर केली. तसे इथे मातापुर, तुळजापूर व कोल्हापूर येथील देवीचे ठाणे पण मानले जाते.या तीन स्वरुपातील देवी मंदीराचे अवशेष डोंगरमाथ्यावर आढळुन येतात. या मंदिराच्या अवशेषाच्या बाजूला एक आयाताकार खड्डा असून त्याला सितेची न्हानी म्हणून संबोधले जाते. आज अस्तित्वात असलेले देवीचे भव्य मंदिर श्रीमंत अहिल्यादेवी होळकर यांनी बांघले असुन त्यामध्ये वरील तीन देवींचे तांदळे स्थापन केलेले आहेत. दरवर्षी नवरात्रामध्ये येथे मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा केला जातो.या उत्सवाची सांगता नवमीच्या दिवशी होणाऱ्या यज्ञातील पूर्णाहुतीने होते व दुसऱ्या दिवशी मोठा उत्सव होतो. या देवीच्या महात्म सांगणाऱ्या काही कथा या भागात ऐकावयास मिळतात.त्यामधील एक कथा अशी आहे.

तानाजी देशमुख हा देवीचा निस्सीम भक्त होता.त्याच्यावर एकदा अफरातफरीचा खोटा आळ आला,त्यावेळी तो देवीच्या दर्शनास जाऊन तेथील कल्लोळात गुप्त झाला.या संदर्भात दुसरी एक लोककथा प्रचलित आहे.या तानाजी देशमुखाला देवी प्रसन्न झाली.देवीने त्याला वर दिला की, तु माझ्या पायाशी शिळा होऊन राहशील व तुझ्या दर्शनाशिवाय माझे दर्शन घडणार नाही.म्हणून लोक आधी तुझे दर्शन घेतील. आजही देवीच्या पायथ्याशी तानाजी देशमुखाची शिळा आहे. अंबरीश राजाच्या मुलाची समाधीपण लोक दाखवितात.भाविक लोक आधी तानाजीचे...व नंतर देवीचे दर्शन घेतात.तानाजीच्या शिळेबाबत असे सांगीतले जाते की, ही शिळा दरवर्षी तिळा-तिळाने वाढते.अशी वाढत जाऊन ती पहिल्या पायरीला टेकली म्हणजे जग बुडणार आहे.ही जगबुडीची जगा वेगळी कल्पना येथे भाविकांच्या श्रद्धेमधुन साकारली आहे.

अशाच प्रकारची एक कथा अंबड तालुक्यातील जामखेड या गावी जाबुवंतांचे मंदीर आहे.या गावात मात्र हनुमंताचे मंदिर नाही.जामखेडच्या उत्तरेला डोंगराच्या रांगेपासून स्वतंत्र असा एक डोंगर आहे.एक खोल असा विवारातुन समोर आलेली एक मुर्ती आणि बाजुला लहान दोन मुखवटे आहेत.श्री जाबुवंतांच्या बाजुला नळ व नीळ यांच्या मुर्ती आहेत. श्रीकृष्ण काळात स्यमंतक मण्यासाठी जांबुवंत व श्रीकृष्णात झालेले युध्द या ठिकाणी झाले असे भाविकांचा समज आहे.म्हणून येथे जांबुवंताचे मंदीर आहे.जामखेडच्या परिसरात बारा वाड्यात हनुमंताचे मंदिर नाही.जांबुवंत हे जामखेडचे ग्रामदैवत आहे.मंदिराचा परिसर निसर्गरमणीय आहे. जांबुवंताचे व हनुमानाचे युध्द येथे झाले. तेव्हा हनुमंताचा पराभव होऊन १२ मैल लांब पळून गेले. म्हणून या जांमखेडपासून १२ मैलाच्या परिसरात हनुमंताचे मंदिर नाही. प्रति वर्षी गुडीपाडव्याला येथे फार मोठी यात्रा भरते.संपुर्ण महाराष्ट्रात जांबवंताचे हे एकमेव स्थान आहे.जांबुवंत अस्वालाचा राजा, प्रभू रामचंद्राचा नि:स्सीम सेवक,शक्तीशाली,अनुभवी विद्वान म्हणून पुराणात प्रसिध्द आहे.सत्यभामा श्रीकृष्णाची पत्नी म्हणजे जांबुवंताची मुलगी होय.

मराठवाड्यातील तुळजापूर येथील तुळजा भवानी देवीची महात्मपर कथा लोकजिवनात आहेत. श्री छत्रपती शिवाजी महाराजांना देवीने भवानी तलवार देऊन स्वराज्य स्थापनेची प्रेरणा देणारी आराध्य देवता,रजोगुळ,अधिष्ठित देवता म्हणून मानली जाते.

बीड जिल्हयातील अंबेजागाई शहरास प्राचीन काळापासून महत्व आहे. याच अंबानगरीहची ग्रामदेवता योगेश्वरी देवी होय. पौराणिक कथेनुसार परळी येथील वैद्यनाथांशी ठरलेला विवाह टाळून कोकणवासी देवीने लग्न रहित केले. कारण राम अवतारात शंकराकडुन झालेल्या अपमानाचा बदला घ्यावयाचा होता.लहानपणापासुन देवीला भक्तीसाधनेचे वेड होत. कोकणवासी असल्यामुळे त्यांची ती कुलदैवत आहे. नवरात्रामध्ये मोठ्या प्रमाणात उत्सवास सुरुवात होते. जागृत देवस्थान असल्यामुळे येथे अनेक नवस फेडले जातात. लोकमाणसात एक शक्तीपीठ म्हणून या स्थळाचे महत्व आहे. नांदेड जिल्हयातील माहुरची रेणुकादेवी हिचे महात्मही मराठवाठ्यात मोठे आहे.परशुरामाची माता,जमदग्नीची पत्नी, ब्रम्हरुपीनी माता, म्हणुन या देवस्थानांकडे आदराने शक्तीचे प्रतिक म्हणून पाहिले जाते.

मराठवाड्यामध्ये लोकजिवनात अशा अनेक देवी-देवतापर लोकथा प्रचलित आहेत.अशीच एक कथा जालना जिल्हयातील रेवगाव परिसरातील जडाई देवी संबंधाने आहे.जड नावाच्या माणसाने तुळजापूर देवीची

आराधना केली.देवी प्रसन्न झाली तेव्हा त्याने माझ्या गावाकडे येण्यासाठी त्याने आग्रह केला. तेव्हा देवीने होकार दिला पण अट घातली. गावापर्यंत मागे वळून पहायचे नाही.देवी त्याच्या खांद्यावर बसली.तो व्यक्ती विदर्भाकडील होता.त्याने रात्र झाली म्हणून थकला मागे वळून पाहिले.तेव्हा देवी तिथेच त्या डोंगरावर थांबली. तो जड नावाचा ब्राम्हणही तेथेच थांबला.तेथे देवीच्या समोर त्याची समाधी आहे.त्यावरुन त्या देवीचे नाव जडाई देवी असे आहे.अशा अनेक कथा मराठवाड्यातल्या परिसरात,लोकमानसात आहेत. खंडोबा,मरीआई,काळूआई अशा अनेक ग्रामदेवतेच्या कथा ही लोकजिवनात प्रचलित आहेत.

मौखिक परंपरेने एका पिढरकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होणारी, प्रदेशानुसार मुळ कथेत बदल स्वीकारुन विस्तारणारी लोककथा रंजनाबरोबर उद्‌बोधनही करते.लोककथेतुन समाजाच्या सामुहिक मनाचे श्रध्दा-संकेताचे दर्शन घडते.या देवीदेवतांच्या कथेतुन लोकजीवनाचे,लोकसंस्कृतीचे,श्रध्दाशिल मनाचे रुढी परंपरेचे दर्शन घडते.सामाजिक मनाचे दर्शन लोककथातुन घडते. म्हणून हा आपला अमूल्य ठेवा आहे.

**संदर्भ ग्रंथः-**

१. लोकसाहित्याचे स्वरुप : डॉ. प्रभाकर मांडे

२. लोकवाड्:मय रुप-स्वरुप : डॉ. शरद व्यवहारे

३. लोकसाहित्य : डॉ. शरद व्यवहारे

४. मराठीचा मोहोर : डॉ. ना.गो.नादापुरकर

५. मराठवाड्यातील लोककथा : डॉ.यू.म.पठान

६. मराठवाडा काल आणि आज : संपा.प्रा.भगवान काळे

७. आपला जालना जिल्हा : प्रा.भगवान काळे

८. मायबोलीचा मराठवाडा : संपा.श्रीराम पाटील

९. लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास- डॉ.शरद व्यवहारे